# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड, पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216

ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in

महाराष्ट्र वन विभाग


पत्र

विषयः- <u>वन जमिन – रायगड</u>

मौजे. चांभार्ली, ता. खालापूर येथील संरक्षीत
वन सर्व्हे नं. 20 (नवीन गट नं. 101) मधुन
पोहाच रस्त्याकरीता वनजमिन मागणीचा प्रस्ताव...

जावक क्र. ब/20/जमिन/3998 /2015-16.

अलिबाग- 402 201, दिनांकः- 15 /12/2015.

प्रति,

श्री. आश्वीन पटेल यांचे वतीने,
श्री. मंदार गडकरी, मु.पो.रा. अलिबाग, जि. रायगड.

संदर्भः- श्री. अश्वीन पटेल वतीने श्री. मंदार गडकरी, रा. अलिबाग यांचेकडील पत्र
दिनांक 21/11/2015.

मौजे चांभार्ली, ता. खालापुर येथील संरक्षीत वन सर्व्हे नं. 20 (गट नंबर 101) यामधुन खाजगी मालकीचे जागेत जाणे-येणे करीता पोहोच रस्त्याकरीता वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत वनक्षेत्र मागणी प्रस्ताव संदर्भीय पत्रान्वये 1 प्रतीत दाखल केला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता, त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत.

1) प्रस्तावांत 1 ते 57 बाबींची चेकलिस्ट.

2) प्रस्तावांत अर्जदार व त्यांचे अखत्यारी यांचा संपूर्ण पत्ता त्यांचे पत्रांत नमुद करावा जेणे करुन प्रस्तावांचे बाबतीतील पत्र व्यवहार करणे सोईचे होईल.

2) फॉर्म नंबर अ – भाग 1 मध्ये ज्या ठीकाणी पान नं. टाकणेचे आहेत, तेथे पान नं. नमुद करण्याची कार्यवाही करावी.

3) फॉर्म नंबर अ – भाग 1 मुद्दा क्रमांक 5 मध्ये बंधपत्राचा पान क्रमांक देणेत यावा.

4) प्रस्तावांत अर्जदार यांनी श्री. मंदार गडकरी (अखत्यारी) यांना प्रस्ताव सादर करणे प्राधीकृत केलेबाबत अखत्यार पत्र देण्यात यावे.

D:\LAND 3\2015-16\FCAct\Chambharli Ashwin Patel\Chambharli approach road.doc

5) प्रस्तावांत उक्त पोहोच रस्त्याचे बांधकामाकरीता अन्य पर्यायी मार्गाची तपासणी करण्यात आली अगर कसे याबाबत नकाशा व त्याबाबतचा तपशील प्रस्तावांत सामील करावा. (3 alignment)

6) प्रस्तावांत अन्य वनेत्तर क्षेत्रांतून रस्ता जात असल्याचे दिसून येत आहे, तरी वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्र अशा सर्व क्षेत्राचा तपशील क्षेत्र विवरण तक्त्यात देण्यात यावा.

7) प्रस्तावांत जोडण्यात आलेल्या ग्रामपंचायत ठराव व 7/12 उता-याची स्वाक्षांकीत प्रत जोडण्यात यावी.

8) ग्राम पंचायत ठरावाची आंग्ल भाषेंतील ठरावाची प्रत जोडण्यात यावी.

9) प्रस्तावांत जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील वनहक्क अधिनियम, 2006 अंतर्गत विहित प्रपत्रांतील प्रमाणपत्र सामील असणे आवश्यक आहे.

सदर प्रस्ताव वनक्षेत्र सर्व्हेक्षक, अलिबाग यांचेकडे नकाशाचे तपासणी करीता देण्यात आलेला आहे. जर त्यांचेकडून त्रुटी काढण्यात आल्यास त्या आपणास वेगळयाने कळविण्याची तजवीज ठेवली आहे.

Sir, F.C. Signed by me
O.S

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतः- वनक्षेत्र सर्व्हेक्षक अलिबाग यांचेकडे माहितीसाठी व प्रस्तावांत त्रुटी असल्यास तात्काळ कळविणेसाठी रवाना.

D:\LAND 3\2015-16\FCAct\Chambharli Ashwin Patel\Chambharli approach road.doc